# <u>चुकीच्या मार्गाने जाणा-या कॉग्रेसच्या युक्त्या</u>

**अरुण जेटली**

**(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)**

कॉग्रेसला स्वताला कोणत्या आव्हानांचा सामना करायचा आहे याचा अंदाज त्या पक्षाला नाही. अर्थव्यवस्थेच्या पुनर्जीवनाबाबत किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपाबाबत कॉग्रेसकडे कोणतेही उत्तर नाही. तसेच श्री नरेंद्र मोदी यांचा सामना करण्यासाठी कोणते राजकीय व्यहरचना करावी याबाबत पण त्यांना माहित नाही. स्वताःची संघटना मजबूत करण्यासाठी लक्ष देण्याऐवजी कॉग्रेस आणि त्यांचे नेते श्री मोदी यांना सीबीआय मार्फत राजकीय रीत्या कशाप्रकारे फसविले जाईल याचा विचार करत आहे आणि अद्वातद्वा टिप्पणी करत आहे. केंद्र सरकार गुजरात सरकार मार्फत एका महिलेवरील जासुसीच्या खर्चाची माहिती मिळवण्यासाठी तपास आयोगाची नेमणूक करण्याच्या विचाराधीन आहे. गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांचे याबाबतचे निवेदन असे संकेत देतात की कॉग्रेस पक्ष नुकत्याच झालेल्या निवडणुक निकालांमधून बोध घेण्यास निष्फळ ठरला आहे.

2 जी स्पेक्ट्रम वाटप ऐतिहासिक घोटाळा आहे . कॉग्रेस असे मानतो की हा घोटाळा संयुक्त गसजतासंसदीय समितीने झाकण्याचा प्रयत्न केला आणि आता त्या मुद्द्याची उकेल झाल्याचे तो मानतो. विरोधी पक्षाच्या खासदारांकडून समितीच्या अहवालाबाबत दाखवण्यात आलेल्या असहमतीची नोंद घेण्यात आली नाही. आदर्श घोटाळ्यात सार्वजनिक मिळकतीची खुलेआम लूट करण्यात आली होती. महाराष्ट्रातील कॉग्रेसी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना याप्रकरणी राजीनामा द्यावा लागला होता. आज कॉग्रेस आदर्श घोटाळ्याच्या तपास समितीचा अहवाल केबिनेट कडून फेटाळून अशोक चव्हाण यांच्या विरोधात तक्रार करण्याची मागणी रद्द करुन

हा मुद्दा पण सावरला गेल्याचे समजते. कॉग्रेस पक्ष असा आक्षेप करतेय की गुजरात पोलिसांकडून एका महिलेची जासूसी करण्यात आली. परंतु वास्तविक पाहता त्या महिलेच्या कुटुंबियांनी अर्ज करुन तिला संरक्षण देण्याची मागणी केली होती. असे असताना गुजरात सरकारने समग्र मुद्द्याच्या तपासासाठी निवृत्त जज यांच्या नेतृत्त्वाखाली तपास आयोगाची नेमणूक केली आहे.  सध्या ते आयोग आपले काम करित आहे. केंद्र सरकार अर्थव्यवस्था आणि भ्रष्टाचाराच्या समस्येबद्दल लक्ष देण्याऐवजी महिलेच्या जासुसी कांडाचा तपास करण्यासाठी खास आयोगाची नेमणुक करीत आहे असे गृहमंत्र्यांचे निवेदन आश्चर्यजनक आहे. केंद्र सरकारकडून या मुद्द्यावर आयोगाची नेमणूक करणे हे घटनेला धरुन नाही. असे करुन, कॉग्रेस पक्ष देशासमोरील समस्यांचा विचार करण्याऐवजी अशी रणनीति अवलंबत आहे.

2 जी स्पेक्ट्रम वाटप घोटाळा जेपीसीने ज्या पद्धतीने झाकला, त्यानंकर संपूर्ण देशाची इच्छा आहे की त्याबाबत तपास करण्यासाठी एका आयोगाची जरुरी आहे. आदर्श घोटाळा तपास समितीच्या अहवालाची अंमलबजावणी आणि दोषींविरुद्ध कारवाई चालू ठेवली पाहिजे. राजस्थान आणि हरियाणा राज्य सरकारने एका नेत्याच्या कथित जमिन घोटाळ्याच्या आरोपांचा तपास करण्याची गरज आहे. या सर्व मुद्द्यांवरुन देशाच्या जनतेचे लक्ष चुकीच्या पद्धतीने वळवून कॉग्रेस पक्ष मुख्य मुद्दा बाजूला ठेवत आहे. ज्यामुळे राजकीय लाभ मिळवू शकेल. मात्र अशा रणनीतिमुळे कॉग्रेसचा हेतू पार पडणार नाही.